## ४९. विषबाधांचे निवडक प्रकार : (अपघात व प्रथमोपचार)

| विषारी पदार्थ गट | विषाचे नाव | घटनेचा प्रकार व कारणे | चिन्हे, लक्षणे, परिणाम | उपचार–प्रथमोपचार |
|---|---|---|---|---|
| प्राणिज विषे | सर्पविष | अपघात | नाग/मण्यार यांच्या बाबतीत मज्जासंस्थेवर परिणाम<br>फुरसे/ घोणस याण्च्या बाबतीत रक्तसंस्थेवर परिणाम | चावलेल्या भागाची ओल्या फडक्याने पुसून स्वच्छता करावी. त्या अवयवाला इलॅस्टिक पट्टी बांधावी आणि काठी बांधून हालचाल थांबवावी आणि रुग्णालयात पाठवावे.<br>**हे करू नये** : ब्लेडने कापून विष काढणे, आवळपट्टी बांधणे यामुळे दुष्परिणाम होतात |
| | विंचवाचे विष | अपघात | दंशाच्या जागी वेदना, लहान मुलास फुप्फुससूज (दम लागणे/काळेनिळे पडणे) | पोटॅशियम परमँगनेट + लिंबूरस लावणे किंवा तुरटी भाजून लावणे. दंशाच्या जागी लिग्नोकेन इंजेक्शन. डॉक्टरकडे पाठवा. |
| वनस्पतीजन्य विषे | अफू, जमालगोटा बी/ एरंड/कण्हेर मूळ | आत्महत्या, अपघात, घातपात, | खूप गुंगी, श्वास जडावणे, बेशुद्धी, जुलाब, उलट्या, शोष. | ताबडतोब रुग्णालयात पाठवा.<br>जलसंजीवनी पाजत राहणे व ताबडतोब रुग्णालयात पाठवा. |
| | धोतरा (बी/फळ) | घातपात, मोहरीमध्ये भेसळ | तोंड कडू व कोरडे, पोटात जळजळ, गिळणे/बोलणे अवघड, त्वचा शुष्क, ताप, चक्कर, स्नायूंच्या स्वैर क्रिया, असंबद्ध पुटपुटणे, निरनिराळे भ्रम, झटके, बेशुद्धी, मृत्यू | दहा लिटर पाण्यात एक ग्रॅम पोटॅशियम परमँगनेट टाकून हे पाणी थोडेथोडे पाजून उलट्या करवणे. ताबडतोब डॉक्टरकडे पाठवा. |
| | अरगट (बाजरी–वरची बुरशी) | अपघाताने, जेवणातून | उलट्या, जुलाब, पोटात वेदना / कळा, चक्कर, झटके, बेशुद्धी, गर्भपात | डॉक्टरकडे पाठवा |
| सूक्ष्मजंतू निर्मित विष | अन्नविषबाधा (भात, मांस इ.) अपघाताने दूषित आचळाचे पूमिश्रित दूध. | अपघाताने, जेवणातून | पोटात दुखणे, उलट्या, जुलाब, शोष | जलसंजीवनी पाजा. रुग्णालयात पाठवा. |
| रॉकेल | रॉकेल | मुले चुकून पितात | क्वचित उलटी, श्वासाला विशिष्ट वास 'रासायनिक न्यूमोनिया' (दम लागणे) | रुग्णालयात पाठवा. उलटी करवू नका. |
| उंदीर, घूस यांचे विष | झिंक फॉस्फाईड आर्सेनिक | चुकून अथवा मुद्दाम अन्नात मिसळणे | तात्काळ घशात/पोटात जळजळ, उलट्या, रक्ताचे जुलाब, पायात पेटके | भरपूर पाणी पाजून उलटी होऊ द्या. रुग्णालयात पाठवा. |
| कीटकनाशके | ऑर्गनोफॉस्फरस व इतर | १) तोडावाटे घेणे, आत्महत्या व कधी घातपात<br>२) फवारणी करताना | श्वासाला विशिष्ट वास, थकवा, घाम, पोटात दुखणे, उलटी, जुलाब, डोळ्यांची बाहुली बारीक होणे, स्नायू वळवळणे, थरकाप, झटके, बेशुद्धी, नाडीचे ठोके मंदावणे | १) मिठाचे पाणी पाजून उलटी होऊ द्या.<br>२)अॅट्रोपीन इंजेक्शने देऊन रुग्णालयात पाठवा. |